आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१६ जून २०२५ - सोमवार

ठळक बातम्या

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सायप्रसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान, जी सहा देश परिषदेसाठी कॅनडाला रवाना
- जनगणना आणि जातनिहाय जनगणनेची अधिसूचना जारी
- गेल्या साडेपाच महिन्यात देशात ९१ वाघांचा मृत्यू, राज्यात सर्वाधिक २६ मृत्यू

आणि

- महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धा ३० सप्टेंबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत भारत आणि श्रीलंकेत होणार

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सायप्रसचा 'ग्रँड कोलार ऑफ दी ऑर्डर ऑफ दी मकारिओस थर्ड' हा सर्वोच्च नागरी सन्मान आज सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस क्रिस्तोदौलिदेस यांनी प्रदान केला. सायप्रसचे पहिले राष्ट्राध्यक्ष आर्चबिशप मकारिओस थर्ड यांच्या नावाचा हा पुरस्कार विविध देशांच्या प्रमुख आणि नामवंत व्यक्तींना त्यांच्या अतुलनीय कार्यासाठी दिला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सायप्रसचा सर्वोच्च नागरी सन्मान मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. भारतीय प्रधानमंत्र्यांनी गेल्या दोन दशकात सायप्रसला दिलेली ही पहिलीच भेट आहे.

विकसित भारत आणि सायप्रसचं व्हिजन २०३५ ही दोन्ही समान उद्दिष्ट असून दोन्ही देशांच्या भागीदारीसाठी एक धोरण आखलं जात असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस क्रिस्तो-दौलि-देस यांच्यासोबत शिष्टमंडळ स्तरावर झालेल्या चर्चेनंतर संयुक्त वार्ताहर परिषदेला ते आज संबोधित करत होते.

या चर्चेत मध्य पूर्व आणि युक्रेन-रशिया यांच्या सुरू असलेल्या युद्धासह अनेक आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा झाली. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्यावर आणि संयुक्त राष्ट्रामध्ये परस्पर सहकार्य करण्यावर दोन्ही नेत्यांमध्ये सहमती झाली. तसंच दहशतवादाविरोधातल्या भारताच्या लढाईला सायप्रसने आपला पाठिंबा जाहीर केला.

भारत आणि सायप्रस हे दोन्ही देश सर्व प्रकारच्या दहशतवादाविरोधात असून शांतता आणि स्थैर्याला बाधा आणणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सज्ज आहेत, असं भारत आणि सायप्रसने दिलेल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे. सर्व देशांनी एकमेकांच्या सार्वभौमत्वाचा आदर करावा तसंच दहशतवाद्यांना अर्थपुरवठा करणारी साखळी उद्ध्वस्त करावी, दहशतवाद्यांना कठोर शिक्षा करावी असं आवाहन दोन्ही देशांनी केलं आहे.

<><><><><>

सायप्रसचा दौरा पूर्ण केल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कॅनडाच्या दौऱ्यावर आज रवाना झाले. आपल्या दोन दिवसांच्या दौऱ्यात प्रधानमंत्री जी सहा परिषदेत सहभागी होतील तसंच कॅनडाच्या प्रधानमंत्र्यांशी संवाद साधतील. प्रधानमंत्री मोदी सलग सहाव्यांदा जी सहा परिषदेत सहभागी होणार आहेत. यात जी सहा देशांच्या प्रमुखांशी ते विविध जागतिक विषयांवर संवाद साधतील. जी सहा हा अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, इटली, जपान, जर्मनी आणि कॅनडा या देशांचा समूह

आहे. संरक्षण, ऊर्जा संरक्षण, डिजिटल स्थित्यंतर हे विषयी यंदाच्या जी सहा परिषदेत चर्चिले जाणार आहेत.

<><><><><><>

गेल्या दहा वर्षात भारताने आपली कार्यक्षमता, वेग आणि अचूक व्यवस्थापन यांच्या बळावर पूर्वसूचना आणि आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले. नवी दिल्ली इथे राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मदतकार्य आयुक्त आणि आपत्ती प्रतिसाद दलांच्या परिषदेला संबोधित करत होते. विविध प्रकारच्या संकटांमध्ये बचावकार्य करण्यासाठी जिल्हा पातळीवर आपत्ती व्यवस्थापन योजना असणं महत्त्वाचं आहे, असं सांगताना विविध राज्यांच्या मदतकार्य आयुक्तांना पुढच्या ९० दिवसात प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्याच्या सूचनाही शहा यांनी दिल्या.

<><><><><><>

जागतिक आरोग्य संघटनेकडे च्या लशींपैकी ७० टक्के लशी भारतात तयार होतात. केंद्रीय रसायन आणि खत मंत्री अनुप्रिया पटेल यांनी आज ही माहिती दिली. इंडियन फार्माकोपिया कमिशन म्हणजेच भारतीय औषध संहिता आयोगातर्फे नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात आज त्या बोलत होत्या. अमेरिकेत आयात होणाऱ्या जेनेरिक औषधांमधे १४ टक्के औषधं भारतात तयार झालेली असतात. जगातल्या १५ देशांनी भारतीय औषध निर्मिती संहिता मानक म्हणून स्वीकारली आहे, असं त्या म्हणाल्या.

<><><><><><>

२०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेची आणि पहिल्यांदाच होणाऱ्या जातनिहाय जनगणनेची अधिसूचना आज राजपत्रात प्रसिद्ध झाली. ही १६वी राष्ट्रीय जनगणना असून भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची आठवी जनगणना आहे. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरांची यादी, मालमत्ता आणि सुविधा या माहितीचं संकलन,

दुसऱ्या टप्प्यात सामाजिक-आर्थिक आणि जात विषयक माहिती संकलन करण्यात येणार आहे. देशातल्या बर्फाळ प्रदेशात जनगणनेसाठी एक ऑक्टोबर २०२६ हा संदर्भ दिनांक निश्चित करण्यात आला आहे, तर उर्वरित देशात एक मार्च २०२७ हा संदर्भ दिनांक असेल.

<><><><><>

अहमदाबाद विमान अपघाताच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीची पहिली बैठक आज नवी दिल्लीत झाली. केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाचे सचिव, गृह मंत्रालय तसंच गुजरातमधले वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांपैकी ११४ जणांचे डीएनए नमुने जुळले आहेत. यापैकी ४७ मृतदेह त्यांच्या कुटुंबाकडे सुपूर्द करण्यात आले आहेत, अशी माहिती अहमदाबाद सरकारी रुग्णालयाचे अतिरिक्त अधीक्षक डॉक्टर रजनीश पटेल यांनी दिली आहे. उर्वरित मृतदेहांचे डीएनए नमुने जुळवण्याची प्रक्रिया अद्याप सुरू आहे.

<><><><><>

गेल्या साडेपाच महिन्यात देशात ९१ वाघांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणाने दिली आहे. त्यातले २६ वाघ राज्यात मृत्यूमुखी पडले आहेत. शिकार, मानव-वन्यजीव संघर्ष, रस्ते अपघात, वाघांचे प्रादेशिक संघर्ष आणि नैसर्गिक कारणांमुळे हे मृत्यू झाले आहेत.

मध्य प्रदेशात २४, कर्नाटकमध्ये नऊ, आसाममध्ये आठ, तर उत्तराखंडमध्ये सात वाघ मरण पावले आहेत. गेल्यावर्षी देशात एकूण १२६ वाघांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

उत्तर प्रदेशातल्या अमरोहा इथं फटाक्याच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात किमान चार महिलांचा मृत्यू झाला, तर ६ पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. घटनेनंतर स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केलं आहे. घटनेची चौकशी करण्यासाठी, परिस्थिती आणि स्फोटामागील कारणं तपासण्यासाठी एक चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.

<><><><><>

भारतात बेकायदेशीररित्या राहणाऱ्या ३६ बांगलादेशी नागरिकांना दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. ज्यात १९ प्रौढ आणि १७ मुलं आहेत. कारवाईदरम्यान, त्यांच्या ताब्यातून १३ बांगलादेशी राष्ट्रीय ओळखपत्रं जप्त करण्यात आली.

<><><><><>

FATF अर्थात वित्तीय कृतीदलानं पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आहे. पहलगाम हल्ला आणि अलिकडे झालेले इतर हल्ले पैशाशिवाय आणि दहशतवाद्यांच्या पाठीराख्यांमधे पैशाच्या देवाणघेवाणीची व्यवस्था असल्याशिवाय होऊ शकत नाही, असं FATF च्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

इस्त्रायलशी सुरु असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, इराण, अण्वस्त्र प्रसार बंदी करारातून बाहेर पडण्याच्या तयारीत आहे. त्यासाठी इराणची संसद कायदा तयार करत असल्याचं इराणचे अध्यक्ष मसौद पेझेश्कियन यांनी सांगितलं. मात्र अण्वस्त्र विकसित करण्याचा आमचा विचार नाही, शांतीपूर्ण ऊर्जा आणि संशोधनावरच आमच्या अणुकार्यक्रमाचा भर कायम राहील, असं त्यांनी स्पष्ट केलं.

अण्वस्त्र प्रसार बंदी करार हा अत्यंत महत्वाचा आंतरराष्ट्रीय करार असून, इराण त्यातून बाहेर पडल्यानं मध्य आशियात अण्वस्त्र स्पर्धा सुरु होण्याची जगापुढची भीती वाढणार आहे. इस्त्रायल - इराण संघर्षात गेल्या ४ दिवसात इराणमधे २२४, तर इस्त्रायलमधे २४ जणांचा बळी गेला आहे. तेहरान इथं केलेल्या हवाई हल्ल्यात इराणचे चार गुप्तचर अधिकारी ठार झाल्याचं इस्त्रायलनं आज सांगितलं. यात इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्ड कोअर इंटिलिजन्स ऑर्गनायजेशनच्या प्रमुखाचाही समावेश आहे. दरम्यान, इस्त्रायलच्या मोसाद या गुप्तहेर संघटनेसाठी हेरगिरी करण्याप्रकरणी दोषी ठरलेल्या इस्माईल फक्रिला इराणनं आज फाशी दिली.

<><><><><>

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाबाबत परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी संयुक्त अरब अमिरातीचे परराष्ट्र व्यवहार मंत्री शेख अब्दुल्लाह बिन झायेद अल नाहयान यांच्याशी आज दूरध्वनीवरून संवाद साधला. जयशंकर यांनी अर्मेनियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अरारत मिर्जोयन यांच्याशीही या विषयावर आणि भारत-अर्मेनिया यांच्यातल्या संबंधांबाबत चर्चा केली.

<><><><><>

यंदाची महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धा भारत आणि श्रीलंकेत येत्या ३० सप्टेंबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहे. भारत, श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, दक्षिण अफ्रिका, न्यूझीलंड, बांगला देश आणि पाकिस्तान हे संघ या स्पर्धेत सहभागी होतील. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं आज या स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर केलं.

३० सप्टेंबरला भारत आणि श्रीलंका यांच्यातल्या सामन्यानं महिला विश्वचषकाला सुरुवात होईल. या स्पर्धेतला उपांत्य फेरीचा पहिला सामना २९ ऑक्टोबरला कोलंबोमध्ये तर दुसरा उपांत्य सामना ३० ऑक्टोबरला बंगळुरुमध्ये

होणार आह□ पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान यांच्यात साखळी स्पर्धेतला सामना ५ ऑक्टोबरला कोलंबोमध्य□ होणार आह□ या स्पर्धेत पाकिस्तान आपल□ सर्व सामन□ श्रीलंकेमध्य□ खेळणार आह□ अंतिम सामना २ नोव्हेंबरला बंगळुरुच्या चिन्नास्वामी मैदानावर होईल. पाकिस्तान अंतिम सामन्यात पोहचला, तर हा सामना कोलंबोत होईल.

//<><><><><><>//